**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**बुधवार दिनांक : ४ डिसेंबर, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्राचे २१वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस उद्या घेणार शपथ.**
2. **महायुतीच्या नेत्यांचा आज राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे सत्ता स्थापनेचा दावा; एकूण २३७ आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र राज्यपालांकडे सादर.**
3. **अन्नधान्याची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी कायदा करण्याची मागणी करत विरोधकांचा आज राज्यसभेतून सभात्याग.**
4. **नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोलीसह दक्षिण भारतात आज सकाळी भूकंपाच्या धक्क्यांची नोंद; तेलंगणा राज्यातील मुलुगु इथं भूकंपाचा केंद्रबिंदू.**

#####

**मुख्यमंत्री पद**

**महाराष्ट्राचे २१वे मुख्यमंत्री म्हणून, देवेंद्र फडणवीस उद्या, मुंबईत आझाद मैदान इथं शपथ घेतील. भाजपच्या मुख्य समितीच्या आज झालेल्या बैठकीत, भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी, फडणवीस यांची निवड करण्यात आली. या प्रक्रियेसाठी, मुख्य निरीक्षक म्हणून, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री, विजय रूपाणी उपस्थित होते.**

**नवनिर्वाचित आमदार चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी, फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व आमदारांनी पाठिंबा दिल्यानंतर, पक्षनेतेपदी फडणवीस यांची निवड जाहीर करण्यात आली. मुख्यमंत्री पदाची शपथ, फडणवीस तिसऱ्यांदा घेणार आहेत तसंच, उपमुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांचा शपथ विधीही होणार आहे.**

**दरम्यान, विधिमंडळ नेतेपदी आणि मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा होताच, नागपुरातील भाजप कार्यकर्त्यांनी, धंतोली इथल्या भाजप कार्यालयामध्ये जल्लोष केला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी, देवेन्द्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या आहेत.**

**तर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात, राज्यातील सर्व समाजाला सर्वसमावेशक दूरदृष्टीनं न्याय मिळेल असा विश्वास व्यक्त करीत भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आणि प्रवक्ते, ॲड.धर्मपाल मेश्राम यांनी फडणवीस यांना शुभेच्छा दिल्यात.**

#####

**सत्ता स्थापनेचा दावा**

महायुतीच्या नेत्यांनी आज, राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्याकडे सत्ता स्थापनेचा दावा केला. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासह, मित्रपक्षांच्या एकूण, २३७ आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र राज्यपालांकडे सादर करण्यात आले. यावेळी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार, प्रफुल्ल पटेल यांसह केंद्रीय मंत्री निर्मला सितारमण, भाजप नेते विजय रूपाणी देखील उपस्थित होते.

राज्यपालांच्या भेटीनंतर महायुतींच्या नेत्यांनी एकत्रित पत्रकार परिषद घेतली. उद्या सायंकाळी आझाद मैदान इथं होणाऱ्या शपथविधी बाबत सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली.

#####

**राज्यसभा सभा त्याग**

अन्नधान्याची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी कायदा करण्याची मागणी करत विरोधकांनी आज राज्यसभेतून सभात्याग केला. आज सकाळी कामकाज सुरू झाल्यानंतर, एम.एस.पी., फेंजल चक्रिवादळ, संभल हिंसाचार आणि एका उद्योजकाच्या लाचखोरी प्रकरणावर, विरोधी पक्षांनी सादर केलेला स्थगन प्रस्ताव, अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला.

त्यानंतर काँग्रेस आणि आपच्या सदस्यांनी, एम.एस.पी. कायद्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. गेल्या आठवड्यात विरोधकांनी गोंधळ घालण्याऐवजी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर स्थगन प्रस्ताव का दिला नाही या, धनखड यांच्या प्रश्नावर काही विरोधकांनी आक्षेप घेतला.

तर काँग्रेसचे सदस्य प्रमोद तिवारी यांनी, सरकारवर एम.एस.पी. संदर्भातल्या मागण्या पूर्ण न केल्याचा आरोप करत, या संबंधित कायदा करण्याची विनंती केली. त्यानंतर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, आप, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या, पक्ष सदस्यांसह, इतर सदस्यांनी सभात्याग केला.

#####

**रेल्वे सुधारणा विधेयक**

रेल्वे सुधारणा विधेयक-२०२४ वर, आज लोकसभेत चर्चा झाली. या विधेयकामुळ, रेल्वे क्षेत्रात कार्यक्षमता वाढीस लागेल असं, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी विधेयकावर चर्चा करताना सांगितलं.

रेल्वेचा अर्थसंकल्प आधीपेक्षा वाढून, ५२ हजार कोटी इतका झाला असून, गेल्या दहा वर्षांत, ४४ हजार किलोमीटरच्या रेल्वेमार्गाचं, विद्युतीकरण झालं आहे असं, अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

तर काँग्रेसच्या मनोज कुमार यांनी, नव्या विधेयकामुळ, रेल्वेचं खासगीकरण होण्याची भिती व्यक्त केली. वंदेभारत गाड्यांमध्ये तिकीटाच्या जास्त दराचा मुद्दाही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

#####

महापरिनिर्वाण

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'महापरिनिर्वाण दिना निमित्त' ६ डिसेंबर रोजी, डॉ.आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर आधारित दोन माहिती पटांचं, माहिती आणि जनसंपर्क, महासंचालनालयाच्या समाज माध्यमांवरून, प्रसारण करण्यात येणार आहे.

'महापुरुष डॉ.आंबेडकर' या माहिती पटाचं प्रसारण, सकाळी अकरा वाजता आणि 'बाबासाहेब आंबेडकर' या माहिती पटाचं प्रसारण, दुपारी एक वाजता तसंच, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर: द अनटोल्ड ट्रुथ' या चित्रपटाचं प्रसारण, दुपारी चार वाजता करण्यात येणार आहे.

#####

भूकंपाचे झटके

चंद्रपूर-गडचिरोलीसह, दक्षिण भारतात आज सकाळी, साडेसातच्या सुमारास, भूकंपाचे धक्के जाणवले. हा भूकंप रिश्टर स्केलवर, ५.३ एवढ्या क्षमतेचा असल्याची पुष्टी झाली आहे. संपूर्ण गोदावरी नदी खो-यात, कमी-अधिक प्रमाणात असे धक्के जाणवलेत. तेलंगणा राज्यातील मुलुगु इथं भूकंपाचा केंद्रबिंदू होता. या दशकातला हा सर्वाधिक तीव्रतेचा भूकंप असल्याची माहिती, पुढे आली असून, गोदावरी फॉल्टमुळ हा भूकंप झाला असल्याची शक्यता, अभ्यासकांनी वर्तविली आहे.

संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात, हे धक्के जाणवले तर, चंद्रपूर जिल्ह्यातील दक्षिण भागात, सौम्य धक्के जाणवले आहेत. त्याचप्रमाणे नागपुरात देखील, आज सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास, भूकंपाचे अती सौम्य झटके जाणवले.

अशा प्रकारचे धक्के पुन्हा जाणवल्यास, नागरिकांनी दक्षता घ्यावी आणि घाबरून न जाता, इमारतीबाहेर मोकळ्या जागेत सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा असं आवाहन, गडचिरोलीचे जिल्हाधिकारी, संजय दैने यांनी केलं आहे.

दरम्यान, गडचिरोली जिल्ह्याला मागील तीन वर्षांत, दोन वेळा भूकंपाचे धक्के बसले आहेत. ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी, सायंकाळी सिरोंचा, अहेरी, चामोर्शी आणि मुलचेरा तालुक्यातील, अनेक गावांमध्ये, भूकंपाचे धक्के बसले होते. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.३ एवढी होती.

त्यानंतर २९ ऑक्टोबर २०२२ रोजी मध्यरात्री सिरोंचा आणि अहेरी तालुक्यातील काही भागात, भूकंपाचे धक्के जाणवले होते. ही तीव्रता रिश्टर स्केलवर ३.८ होती.

आज झालेल्या भूकंपाची तीव्रता, ही दोन्ही भूकंपापेक्षा अधिक म्हणजे, ५.३ रिश्टर स्केल एवढी आहे.

#####

**आर्थिक मदत**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून, विद्यार्थ्यांना, विद्यार्थी सहाय्य निधीतून, आर्थिक मदत केली जाते. याकरिता, विद्यार्थ्यांकडून दोन जानेवारी २०२५ पर्यंत, अर्ज मागविण्यात आले आहेत.

विद्यापीठ शैक्षणिक विभाग संचलित आणि संलग्नित महाविद्यालयातील गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, वसतीगृह भाड आणि जेवणाचा खर्च आदींसाठी आर्थिक मदत करते.

#####

**युवा महोत्सव**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा, नेहरु युवा केंद्र, वाशिम तथा, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या मार्फत, जिल्हास्तरावर युवा महोत्सव आणि विज्ञान प्रदर्शनाचं आयोजन आज आणि उद्या करण्यात आलं आहे.

आज सकाळी दहा वाजता कथा लेखन, चित्रकला, कविता, फोटोग्राफी या स्पर्धांनी या युवा महोत्सवाचा प्रारंभ झाला.

#####

**क्षयरोग मोहीम**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत, जिल्हयात सात डिसेंबर २०२४ पासून, शंभर दिवसीय, क्षयरोग शोध मोहीम, राबविण्यात येणार आहे. ही मोहीम, सात डिसेंबर रोजी सुरू होणार असून, २४ मार्च २०२५ जागतिक क्षयरोग दिन रोजी, संपणार आहे.

या दरम्यान जिल्हयातील, १९१ प्राथमिक आरोग्य केंद्र, उप-केंद्रातील आरोग्य कर्मचारी मार्फत, तीन लाख ६१ हजार ५८९, जोखमीच्या नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे. या मोहीमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, मोहिमेत सर्व नागरिकांनी सक्रिय सहभागी होऊन, क्षयरोग मिटवण्यासाठी तसंच, २०२५ पर्यंत, भंडारा जिल्हा क्षयरोगमुक्त होईल यासाठी, प्रयत्न करावे असं आवाहन, जिल्हाधिकारी डॉ.संजय कोलते यांनी केलं आहे.

#####

**हवामान**

प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरच्या अंदाजानुसार, नागपूर जिल्ह्यात पुढील पाच दिवस, आकाश आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील धान आणि इतर पिकांची कापणी तसचं मळणी करून ठेवावी.

तसंच कपाशीची जातवार स्वच्छ वेचणी करून, कोरड्या जागेत कापूस साठवण्याचा सल्ला, जिल्हा कृषी हवामान केंद्र, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूरव्दारे देण्यात आला आहे.

दरम्यान, येत्या काही तासांत, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांत, हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

#####

क्रिकेट

१९ वर्षांखालील, आशिया कप क्रिकेट स्पर्धेत, भारतानं संयुक्त अरब अमिरातवर, दहा गडी राखून, विजय मिळवला. यू.ए.ई.च्या, १३८ धावांचं आव्हान, भारतानं, सतराव्या षटकातच पूर्ण केलं.

आयुष म्हात्रेनं ६७ तर वैभव सूर्यवंशीनं, ७६ धावा करत, भारताचा विजय निश्चित केला.

#####

नदीजोड प्रकल्प

बहुप्रतिक्षित वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाच्या सर्वेक्षणाच्या कामाला लवकरच सुरुवात होण्याची शक्यता असून, यामुळ अकोला जिल्ह्यातील, ८४ हजार हेक्टर क्षेत्राला, सिंचनाची सोय होणार आहे.

करिता चार नवीन सिंचन प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या सात जिल्ह्यातून हा नदीजोड प्रकल्प जाणार आहे. ४१५ किलोमीटरच्या प्रवासात, तीन टप्पे असून, अकोला पाटबंधारे मंडळा अंतर्गत, या प्रकल्पाच्या दोन टप्प्याचं काम होणार असल्याचं, आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे.

#####

कर्ज मंजूर

राज्यातल्या मागास जिल्ह्यांचा विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या जागतिक बँकेच्या उपक्रमा अंतर्गत जागतिक बँकेच्या कार्यकारी संचालक मंडळानं, महाराष्ट्राला तीन डिसेंबर रोजी, नव्यानं कर्ज मंजुर केलं आहे. विकासाची संधी निर्माण करणं, खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणं हे याचं उद्दिष्ट आहे.

राज्याच्या जी.डी.पी.पैकी, पन्नास टक्के उत्पादन, केवळ सात जिल्ह्यांमध्ये होतं. त्यामुळ राज्यातल्या इतर जिल्ह्यांच्या विकासाच्या गतीमध्ये, मोठ्या प्रमाणात असमानता आहे.

**या उपक्रमामुळ, महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यात विकासाचं उद्दिष्ट साध्य करायला हातभार लागेल असं, जागतिक बँकेचे, भारतातले संचालक, ऑगस्ते तॅनो कौम यांनी सांगितलं.**

#####